## थोडक्यात

### ग्रामीण डाक सेवक पदाची 21 रिक्त पदे भरली जाणार; इच्छुक उमेदवारांनी 3 मार्च पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय डाक विभागामार्फत अधीक्षक डाकघर, नवी मुंबई विभाग यांच्या कार्यक्षेत्रातील ग्रामीण डाक सेवक पदासाठी (२१ रिक्त पदे) भरली जाणार आहेत. पात्र व इच्छुक उमेदवारांनी ०३ मार्च, २०२५ पर्यंत व त्यापूर्वी https://indiapostgdsonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावे, असे आवाहन नवी मुंबई विभाग, वाशीचे वरिष्ठ अधीक्षक डाकघर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. उमेदवाराने अर्ज ऑनलाईन पद्धतीद्वारे करणे आवश्यक आहे. कोणत्याही अन्य माध्यमाद्वारे आलेले व व्यक्तिश: आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. अधिसूचने मध्ये नमूद केलेल्या सूचनांनुसार शुल्क भरणे आवश्यक आहे. पोस्ट विभाग उमेदवारांना कोणताही फोनकॉल करत नाही. संबंधित प्राधिकरणाद्वारेच उमेदवारांशी, पत्रव्यवहार, केला जातो. उमेदवारांनी त्यांची वैयक्तिक माहिती, नोंदणी क्रमांक, मोबाईल क्रमांक, ईमेल आयडी इतरांसमोर उघड करू नयेत आणि कोणत्याही अवैध फोन कॉल्सपासून सावध राहावे, अधिक माहितीसाठी www.indiapostgdsonline.gov.in संकेस्थळास भेट द्यावी. नियम व अटी वरील संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

### जीवनात आचरण हाच मोठा धर्म आहे - दत्ता महाराज हुके

**बीड । प्रतिनिधी**


अण्णा महाराज शेळके

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त एक दिवस कुठेही मिरवणूक काढली जाते. पण सात दिवस चांगले विचार, भक्तिमय वातावरण निर्माण करणारे गाव म्हणजे रामनगर आहेत. अत्यंत सुंदर नियोजन केले असून जीवनात आचरण हाच मोठा धर्म आहे. माणसाच्या आयुष्यात तो काय आचरण करतो हे महत्वाचे असल्याचे हभप भागवताचार्य दत्ता महाराज हुके यांनी सांगितले. बीड तालुक्यातील रामनगर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री क्षेत्र रामगड संस्थानचे मठाधिपती स्वामी योगीराज महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताहात दुसऱ्या दिवशीचे पुष्प गुंफताना दत्ता महाराज हुके यांनी जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांच्या म्हणउनि शरण जावें सर्वभावें देवासी, तो हा उतरील पार, भवदुस्तरनदीचा ।।

बहु आहे करुणावंत, अनंत हें नाम ज्या,

तुकाम्हणे साक्षी आले, तरी केलेप्रगट।। या अभंगावर सुंदर असे चिंतन केले. तसेच रयतेच्या मनातील स्वराज्य निर्माण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी जिवाला जीव देणारा एक एक मावळा गोळा केला होता. जन कल्याणाचा विचार केल्यामुळे शिवाजी महाराज छत्रपती झाल्याचे सांगितले. यावेळी मसुराम महाराज कदम, शिवाजी महाराज नेवडे, अण्णा महाराज शेळके, बाळकृष्ण महाराज मोरे, उत्तरेश्वर महाराज पूर्भे, रावसाहेब महाराज मेखले, मृदुंगाचार्य रमेश महाराज पिसाळ, साहेबराव पिसाळ, निर्गुण महाराज गव्हाणे, परमेश्वर माने, काशिनाथ महाराज बांड, अण्णा महाराज चोपदार, पिसाळ महाराज, बाळू महाराज बाबर, रामनाथ महाराज चव्हाण, त्रिंबक महाराज चव्हाण, निलेश मोहिते, बाबू मोहिते, पांडुरंग सातपुते, माऊली दादा वारकरी शिक्षण संस्था, भेंडटाकळी येथील विद्यार्थी उपस्थित होते.

### मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पोलिस अधीक्षक यांना निवेदन - पत्रकार पिसाळ यांच्यावर प्राणघातक हल्ला

**बीड । प्रतिनिधी**

पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्यावर खुनी हल्ला करणाऱ्या आरोपीवर गंभीर कारवाई करण्यात यावी. या मागणीसाठी मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांना निवेदन देऊन मागणी करण्यात आली आहे.

सांगली जिल्ह्यातील विटा येथील पत्रकार प्रसाद पिसाळ यांच्यावर खुनी हल्ला करण्यात आला आहे. पत्रकार पिसाळ यांच्यावर हल्ला करणाऱ्या आरोपीवर गंभीर कारवाई व्हावी. या मागणीसाठी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त मा. श्री. एस. एम. देशमुख सर यांच्या आदेशानुसार संपूर्ण राज्यात पोलिस स्टेशन मध्ये निवेदने दिली जात आहेत. त्याअनुषंगाने या निवेदनात असे ही म्हटले आहे की, या प्रकरणात योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागाचे सचिव रवी उबाळे ,विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, तालुका समन्वयक लक्ष्मण नरनाळे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### दिल्लीतील साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने अभिजात मराठीचा 'ऑनलाईन जागर'!

**मुंबई । प्रतिनिधी**

दि. २१ ते २३ फेब्रुवारीदरम्यान दिल्ली येथे होणाऱ्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने अभिजात मराठीचा 'ऑनलाइन जागर' हा अनोखा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमात आपल्या कलागुणांचा व्हिडिओ शेअर करून देश विदेशातील मराठी माणसांपर्यंत पोहोचण्याची संधी मिळणार आहे. आपले व्हिडिओ हे माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या 'महासंवाद' या पोर्टल वर आणि महासंचालनालयाच्या राज्यभरातील कार्यालयांच्या अधिकृत समाजमाध्यमांवर प्रसिद्ध करण्यात येतील.

# दैनंदिन वापरात इंधन बचत केल्यास शाश्वत विकास शक्य

**मुंबई । प्रतिनिधी**

सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करणे, तसेच दैनंदिन वापरात इंधनाची बचत केल्यास भविष्यासाठी ऊर्जा सुरक्षा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्ट गाठता येईल, असा विश्वास महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.



पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि राज्य शासनाच्या सहकार्याने हरित उर्जेचा वापर करून पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येतात. या अंतर्गत सक्षम २०२४-२५ (संरक्षण क्षमता महोत्सव) १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंत्री कु. तटकरे बोलत होत्या.

कार्यक्रमास भारत पेट्रोलियम कार्पोरेशनचे बिझनेस हेड राहूल टंडन, हिंदुस्थान पेट्रोलियम कार्पोरेशनचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक देबाशिश बसक, बीपीसीएलचे राज्य प्रमुख राकेश सिन्हा,इंडियन ऑईलचे व्यवस्थापकीय संचालक अभिजीत गिते, जीएआयएल इंडिया लि.चे उपसंचालक मोहम्मद शफी अवान, वरिष्ठ व्यवस्थापक दिपक वाघ, रितेश जाधव यांच्यासह अधिकारी आणि विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी रंगमंच समुहाच्या पथनाट्याद्वारे मुलांना इंधनबचतीचा संदेश देण्यात आला. तसेच इंधन बचतीसाठी यावेळी सामूहिक प्रतिज्ञाही घेण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महोत्सवास शुभेच्छा दिल्या.

# बीडच्या पठ्याने संशोधनामध्ये गाजवल कर्नाटक राज्य

## डॉ. अमोल विरकर यांना ग्लोबल परिषदमध्ये बागलकोट (कर्नाटक) विद्यापीठाचा सर्वोच्च मानला जाणारा Best Plantation Crop Specialist Award या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले

**बीड । प्रतिनिधी**

कर्नाटक (बागलकोट) मध्ये तीन दिवस झालेल्या ग्लोबल परिषदमध्ये संशोधन मांडण्यात व सांगण्यात आले, तरी ह्या ग्लोबल परिषदमध्ये विविध राज्यातून तसेच देशातून नामांकित शास्त्रज्ञ आलेले होते, त्यात कर्नाटकमधील चारही विद्यापीठाचे कुलगुरू तसेच नामाकींत शास्त्रज्ञ उपस्थित होते त्यात बंगलोर, धारवाड, कोगडू व विजयपुरा यांचा समावेश होता. शास्त्रज्ञ डॉ. अमोल महादेव विरकर (सहाय्यक प्राध्यापक, उद्यानविद्या विभाग , महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी) हे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी या आपल्या महाराष्ट्रातील विद्यापीठमधून गेले होते, तर त्यांनी ४ (लिंबू, आंबा, काजू व नारळ) फळझाडावर प्रयोग करून तो परिषदमध्ये मांडला तर त्यातील चारही प्रयोग लक्षात घेता व शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल व कमी पाण्यावर जास्तीत जास्त कसे उत्पन्न मिळेल व वाढेल यावर डॉ. अमोल सर यांनी सविस्तर शास्त्रज्ञांची प्रश्नांची निरासन केले व समजून सांगितले या अनुषंगाने डॉ. अमोल विरकर सर यांना Best Plantation Crop Specialist ward या कर्नाटकच्या (University of Horticulture Sciences, Bagalkot, Karnataka) यांच्यावतीने सर्वाच्च मोठा मानला जाणारा कृषी क्षेत्रातील व कृषीविषयी उल्लेखनीय कार्याबद्दल कर्नाटक विद्यापीठाचा पुरस्कार देण्यात आला. डॉ. विरकर अमोल यांना याआधी उत्तर प्रदेश विद्यापीठाचा सर्वोच्च उद्यानविद्या पुरस्कार, कृषिभूषण पुरस्कार, महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा सर्वोच्च पोस्टर सादरीकरण तसेच तोंडी सादरीकरण पुरस्कार, उत्कृष्ट संशोधन पुरस्कार, उत्कृष्ट अमूर्त पुरस्कार.




### राजर्षी शाहू कन्या विद्यालयातील दहावीच्या विद्यार्थ्यांनींना समारंभपूर्वक निरोप

**बीड । प्रतिनिधी**

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड संचलित,राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी विद्यार्थीनींचा निरोप समारंभाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्रा.जे.पी.शेळके, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम.कदम एस.डी., मुख्याध्यापक आर.टी. राऊत, प्राचार्या श्रीम आर. डी. लोखंडे यांची उपस्थिती होती.


कार्यक्रमाची सुरुवात श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन करण्यात आले. दहावीची परीक्षा देणार्या विद्यार्थीनींना निरोप व मार्गदर्शन करतांना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.जे.पी.शेळके यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन करतांना सांगितले की, तुम्ही उद्याच्या युवा पिढीचे भविष्य आहात. तुमच्या जीवनाला कलाटणी मिळण्याची ही दहावीची परीक्षा म्हणजे पहिली पायरी आहे. तुम्ही येथून जातांना मन भरुन येत असले तरी या शाळेतील विद्यार्थीनी या नक्कीच आपल्या आयुष्यात यशस्वी होतील असा विश्वास असल्याचे सांगून विद्यार्थीनींना खुप खुप शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम.एस. डी. कदम म्हणाल्या की, तुम्ही देखील तुमच्या आई-वडीलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अभ्यास करुन मनसोक्त परीक्षा द्या असे सांगून त्यांनी विद्यार्थीनींना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख एस. सी. जगताप, श्रीम. एम. एस.सोनवणे,झोडगे जी.एस., सोंडगे के.बी.,यांनी देखील विद्यार्थीनींना परीक्षेसंदर्भात मार्गदर्शन केले.विद्यार्थिनीच्या वतीने कु. विश्वाजली कोल्हे हिने शुभेच्छा दिल्या. तर सुत्रसंचलन कु प्रांजली कदम तर आभार प्रदर्शन कु. शेख अंजुम हिने केले.

# कॉपीमुक्त वातावरणात वडवणी तालुक्यातील बारावीच्या परिक्षा सुरळीत सुरु

## नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई होणार : गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे

**वडवणी । प्रतिनिधी**

मंगळवार दिनांक ११ फेब्रुवारी रोजीपासून बारावी बोर्डाच्या परिक्षा सुरु झालेल्या आहेत. या बारावीच्या परिक्षेत वडवणी तालुक्यातील कला, विज्ञान, वाणिज्य, व एमसीव्हीसी या चार शाखेतील जवळपास ३ हजार १९६ विद्यार्थी हे परिक्षा देत असून काल गुरुवार रोजीपर्यंत बारावीचे तीन विषयांचे पेपर संपले आहेत. वडवणी परिरक्षक केंद्राअंतर्गत असलेल्या सर्व आठ परिक्षा केंद्रांवर कॉपीमुक्त वातावरणामध्ये परिक्षा सुरळीतपणे सुरु असून या परिक्षांमध्ये कॉपीमुक्तीची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात आहे. जर कोणीही या नियमांचे उल्लंघन केले तर त्यावर कठोर कारवाई करण्यात येईल असा सज्जड इशाराही वडवणी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी तथा परिरक्षक केंद्राचे प्रमुख बाबासाहेब उजगरे यांनी दिला आहे.



वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय याठिकाणी असलेल्या सी.यू.१३५ केंद्राअंतर्गत वडवणी, धारुर व बीड या तालुक्यांमधील एकूण ८ परिक्षा केंद्र येतात. या सर्व परिक्षा केंद्रांमध्ये कॉपीमुक्त परिक्षा पॅटर्न अंतर्गत बारावी बोर्डाच्या परिक्षा सुरळीतपणे सुरु असून यामध्ये नविन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय लिंबा रुई याठिकाणी ४८८, सिध्दीविनायक महाविद्यालय पिंपळनेर याठिकाणी ३३०, महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी याठिकाणी ३७२, लोकमान्य टिळक महाविद्यालय वडवणी या ठिकाणी ३४९, छत्रपती राजश्री शाहू महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी याठिकाणी २२८, सरस्वती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तेलगांव याठिकाणी ५९४, अशोक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिंचाळा याठिकाणी ३८२, मंकावती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चिंचवण याठिकाणी ४५३ अशाप्रकारे एकूण ८ परिक्षा केंद्रावर ३ हजार १९६ विद्यार्थी बारावी बोर्डाच्या परिक्षेस बसलेले आहेत.

## जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी.पाटील ६वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर २९४/२०२५, हरिभाऊ केशवराव आमटे विरूध्द निरंक**

अर्जदार- १.हरिभाऊ पि. केशवराव आमटे वय: ७५ वर्षे, धंदा घरकाम, रा. खांडेपारगाव ता. जि. बीड. २.अशोक पि. हरिभाऊ पि. आमटे वय: ४८ वर्षे, धंदा शेती, रा. खांडेपारगाव ता. जि. बीड, ३.सुदाम पि. हरिभाऊ पि. आमटे वय ४६ वर्षे, धंदा शेती, ता. जि. बीड. ४. मिरा भ्र. हरिभाऊ पि. आमटे वय: ३९ वर्षे, धंदा शेती घरकाम, रा. जरूड,

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

**मागणी : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत महानंदा हरिभाऊ आमटे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी महानंदा हरिभाऊ आमटे, रा. खांडेपारगाव ता. जि. बीड. मृत्यु दि. १९/१०/२०२३ मौजे . खांडेपारगाव ता. जि. बीड. येथे मयत झालेल्या असून अर्जदार क. १ हा मयत महानंदा हरिभाऊ आमटे यांचा पती असून अर्जदार क्र. २ ते ३ हे मयताचे मुळे आहेत.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू आणि हया अर्जदार हयांचे हक्काबददूल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत - महानंदा हरिभाऊ आमटे, रा. पाटेगांव पो.पंपळनेर ता. जि. बीड. याचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १३ माहे ०२ सन २०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २४/०३/२०२५ आहे.

**(मार्फत ॲड. हंबे)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**मा. के सी बागल मॅडम. ८ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर बीड ता. जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : २६९/२०२५, सयद शाहिन व इतर वि. - निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **सय्यद मुबारक स. सफदर** रा. बालेपीर, बीड ता. जि. बीड हे दि. १६/०९/ २०२४ रोजी मौजे बीड येथील सरकारी दवाखाना येथे मयत झाले आहेत.

अर्जदार १) सय्यद शाहीन बेगम सय्यद सरफराज रा. बालेपीर, बीड, ता.जि.बीड, २) शमीम बेगम महमूद रफिक रा. बगा वस्ती नेकनुर ता. जि. बीड, ३) रिजवाना जाहीर उल्ला सय्यद रा. पोलीस कॉलनी नगर रोड बीड ता. जि. बीड. ४) रेहाना मसिउल्ला सिद्धिकीरा, हवळे गली अंबाजोगाई जि.बीड, ५) सुरैय्या नजार पटेल रा. बालेपीर, बीड ता. जि. बीड, ६) सय्यद अफसर सय्यद मुबारक आली जागीरदार रा. पोलीस कॉलनी नगर रोड बीड ता.जि.बीड (७) सय्यद अकबर आली सय्यद मुबारक रा. पोलीस लाईन, बालेपीर बीड ता. जि. बीड, ८) सय्यद निसार सय्यद मुबारक आली रा. पोलीस कॉलनी बालेपीर, बीड, ता.जि. बीड, (९) सय्यद सीरत बेगम सय्यद अमानत रा. चाउस गल्ली, अमराई बालेपीर, बीड ता.जि.बीड १०) सय्यद अजीजा बेगम नसीर रा. अमराई बालेपीर, बीड ता.जि.बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल. तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे सय्यद मुबारक स. सफदर रा. बालेपीर, बीड ता.जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज १३/०२/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख : २५.०३.२०२५

**(मार्फत- ॲड. के व्ही दाभाडे बीड)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) अधीक्षक, दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. ए. डी. कुलकर्णी यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १३१/२०२५, सुरेखा विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **सुरेश किसनराव सोलाट हे दिनांक १८/०१/२०२५ रोजी गडगाव ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले आहेत. अर्जदार १. सुरेखा सुरेश सोलाट वय ४४ वर्षे, धंद-घरकाम रा. गौडगाव ता. गेवराई जि. बीड २. गीतांजली सुरेश सोलाट वय-२४ वर्षे, धंदा घरकाम रा. गौंडगाव ता. गेवराई जि. बीड ३. सोनाली सुरेश सोलाट वय-२० वर्षे, धंदा-शिक्षण रा. गौंडगाव ता. गेवराई जि. बीड यांना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदरअर्जदाराच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नाम सुरेश किसनराव सोलाट यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४/०२/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायलयाच्या शियानिशी दिले. पुढील नरीख १८/०३/२०२५

**(मार्फत ॲड. टेकाडे वाय. एस. गेवराई)**

**आदेशावरून.**

(स्वाक्षरीत) क.लिपीक | शिक्का | (स्वाक्षरीत) सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई

# 2 हजार 183 विद्यार्थ्यांची आरटीई अंतर्गत इंग्रजी शाळेतील मोफत प्रवेशासाठी निवड

## पडताळणी समितीने चोक पणे कागदपत्रांची पडताळणी करावी : मनोज जाधव
## १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करता येणार

**बीड । प्रतिनिधी**

२०२५ - २६ या शैक्षणिक वर्षासाठी बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षण हक्क कायद्यानुसार शाळामध्ये आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात येत आहे. आरटीई २५ टक्के ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची सोडत सोमवारी शिक्षण आयुक्तांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे येथे काढण्यात आली. यात जिल्ह्यातील २ हजार १८३ विद्यार्थ्यांची इंग्रजी शाळेत मोफत प्रवेशासाठी निवड करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांना १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी या कालावधीत प्रवेश



निश्चित करता येणार आहेत. आरटीई प्रवेश प्रक्रियात १४ जानेवारी ते २ फब्रुवारी पर्यंत पालकांना ऑनलाईन अर्ज

**पडताळणी समितीने चोक पणे कागदपत्रांची पडताळणी करावी, पालकांनी आपल्या पाल्यांच्या प्रवेशासाठी खोटी, चुकीची माहिती भरून किंवा खोटे कागदपत्र तयार करून प्रवेश निश्चित करत असतील तर निवड समितीच्या निदर्शनास आल्यास खोटी चुकीची माहिती भरून दिशाभूल केल्याप्रकरणी आरटीई २५ टक्के प्रवेश नियमानुसार रद्द करण्यात यावा . २५ टक्के प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पध्दतीने पद्धतीने राबविली जात असून, यात कसलाही मानवी हस्तक्षेप नाही. तेव्हा पालकांना बालकांच्या प्रवेशासंदर्भात कोणत्याही प्रकारचे प्रलोभने दिले जात असतील, तर अशा प्रलोभनांना कृपया बळी पडू नये, असे आवाहन शिवसंग्राम चे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केले आहे.**

करण्याची मुभा देण्यात आली होती. यात जिल्ह्यातील २१४ खासगी शाळांत २ हजार २३५ जागा आरटीई प्रवेशासाठी उपलब्ध होत्या या जागा करिता ५ हजार ७८१ इतके अर्ज प्राप्त झाले होते. यातून आता २ हजार १८३ विद्यार्थ्यांची मोफत प्रवेशासाठी निवड करण्यात आली आहे. आरटीई २५ टक्के लॉटरीद्वारे निवड झालेल्या बालकांच्या पालकांचे कागदपत्र पडताळणी करण्यासाठी तालुकास्तर गटशिक्षणाधिकारी कार्यालयात पडताळणी समिती स्थापन केल्या आहेत. पडताळणी समिती कागदपत्रांची तपासणी करूनच विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करतील. विद्यार्थ्यांच्या नावापुढे ज्या दिनांकास विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी बोलविले आहे. त्या पालकांकडून मूळ कागदपत्रे व एक छायांकित प्रत पडताळणी समितीने देऊन कागदपत्रांची पडताळणी करत आपल्या पाल्यांचे प्रवेश निश्चित करायचे आहेत.

# माजलगावातील भागवत कथेची उत्साहात सांगता



**माजलगाव । प्रतिनिधी**

शहरामध्ये शिवसेवाभावी संस्थेच्या वतीने शिवजयंतीनिमीत्त आयोजित विवाह सोहळ्यातील श्रीमद् भागवत कथेची सांगता आज दि. १४ शुक्रवारी झाली.

शहरामध्ये बाळु ताकट यांचे वतीने शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने आगळ्या - वेगळ्या पध्दतीने शिवजन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन सामुदायिक विवाह सोहळ्याच्या ठिकाणी श्रीमद् भागवत कथा झाली. दि. ८ फेब्रुवारीला कथेला सुरूवात झाली होती. उज्जैन मध्यप्रदेश येथील कथाकार साध्वी अनन्या दिदी शर्मा यांच्या सुश्राव्य वाणीतुन मागील सात दिवस कथा चालली. सात दिवसीय श्रीमद् भागवत कथेतुन अनन्या दिदींनी विवीध पैलु सांगीतले तर कथेत शिव - पार्वती विवाह, कृष्ण जन्मोत्सव, गोवर्धन पर्वत, श्रीकृष्ण लिला, कंस वध, रूक्मणी विवाह, व्दारकादीश - सुदामा भेट अशा विवीध झ्याक्यांनी कथेने लक्ष वेधले होते. दि. १४ शुक्रवारी या भागवत कथेची सांगता झाली तर याच ठिकाणी दि. १४ ते १६ किर्तन महोत्सव, दि. १७, १८, १९ फेब्रुवारी दरम्यान तिरूपती बालाजी देवस्थान येथील श्रीनिवास कल्याणम् महोत्सवात श्री देवी व भुदेवी भगवान स्वामी व्यंकटेश्वर सोबत दिव्य लग्नाची अनुभुती घेण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक करण्यात आले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आज बैठक

**कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे:जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के**



**बीड । प्रतिनिधी**

आज दिनांक १५ फेब्रुवारी २०२५ वार शनिवार रोजी सकाळी ११ वा.राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते यांची महत्त्वपूर्ण बैठक राष्ट्रवादी भवन बीड येथे होत आहे, याप्रसंगी उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे. या जिल्हा कार्यकारणी व कार्यकर्ता बैठकीसाठी बीड लोकसभा मतदारसंघाचे लोकप्रिय खासदार बजरंग बप्पा सोनवणे आमदार संदीप भैया शिरसागर व जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्या उपस्थिती संपन्न होणार आहे. आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद पंचायत समिती नगर पंचायत नगरपालिका निवडणुकी संदर्भात पदाधिकारी कार्यकर्ते महत्त्वपूर्ण बैठक संपन्न होणार आहे. तरी या बैठकीसाठी आमदार, माजी आमदार, जिल्हा पदाधिकारी, प्रदेश पदाधिकारी, तालुका पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन केले आहे.

# श्री क्षेत्र चाकरवाडी चे सुपुत्र महेश पवार यांची महसूल सहाय्यक पदी निवड

**महसूल अधिकारी झालेल्या महेश पवार ने वडिलांना परत व्यासपीठावर बसवले ; महसूल अधिकारी महेश पवार यांचा गावकऱ्यांनी केला सत्कार**

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील श्री क्षेत्र चाकरवाडी चे माजी सरपंच छत्रभूज पवार यांचे चिरंजीव महेश पवार यांची एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन महसूल सहायक पदी निवड झाली असल्याने बीड तालुक्यातील सर्व स्तरातून अभिनंदन करून कौतुक होत आहे. महेश पवार यांची एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होऊन महसूल सहायक पदी निवड झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने मिरवणूक काढत गावकऱ्यांनी



स्वागत केले. स्पर्धा परीक्षा आणि त्यासाठीची तयारी ही सामान्यतः कठीण आणि आव्हानात्मक असते. मात्र, अनेक अडचणींवर मात करून महेश पवार याने यश संपादन करून संपूर्ण गावात आपल्या कुटुंबाचा परत एकदा सन्मान वाढवला आहे. या यशाबद्दल चाकरवाडी गावासह संपूर्ण बीड तालुक्यातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिद्द, संघर्षाची तयारी आणि त्याला अभ्यासाची जोड असेल, तर कुठल्याही परिस्थितीवर मात करता येते. यावेळी या कार्यक्रमासाठी उपस्थित ह भ प महादेव महाराज तात्या श्रीक्षेत्र चाकरवाडी, आदर्श पोलीस पाटील नानासाहेब काकडे, ज्ञानोबा आनवणे, महेश पवार यांचे वडील छत्रभूज पवार तसेच नातेवाईक आणि ग्रामस्थ मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते.

# जय शिवाजी -जय भारत पदयात्रेचे आयोजन करणार

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी साजरी होत आहे. या निमित्ताने केंद्र शासनाने महाराष्ट्रातील सर्व ३६ जिल्हयामध्ये जय शिवाजी- जय भारत पदयात्रा राबविण्याचा निर्णय घेतला आहे. ही जय शिवाजी-जय भारत पदयात्रा ४ ते ५ कि.मी. इतक्या अंतराची आयोजित करुन यामध्ये औद्योगिक प्रतिष्ठाणे, महाविद्यालये, नवउद्योजक, शैक्षणिक संस्था, सांस्कृतीक वारसा जतण करणा-या बाबी तसेच शहरातील व राज्यातील महत्वपूर्ण बाबी यांचे प्रदर्शन होईल असा सर्वकष विचार करुन संदर्भ क्र. ३ नुसार बैठकीत दिलेल्या निर्देशानुसार दि. १९ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळच्या सत्रात पदयात्रेचे आयोजन करण्यात यावे.

# परळीच्या युवकाची दुबईत बुलेट रेल्वेच्या ऑपरेशन मॅनेजर पदी निवड

**परळी सह जिल्ह्याच्या शिरपेचात इंजि. राजू जगतकर यांच्यामुळे आणखी एक मानाचा तुरा**

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा म्हटलं की दुष्काळी भाग कधी ओला तर कधीच कोरडा दुष्काळ या बीड जिल्ह्याने नेहमीच पाहिला आहे. यात शेतकऱ्यांची पोरं आता शेती नको शिक्षण हवं याच दृष्टिकोनातून शिक्षणाच्या पाठी लागले आहेत मात्र शिक्षण करूनही नोकरीचा किंवा नोकरी मिळण्याच्या संधीची



नेहमीच वाट बघतात मात्र कधी नोकरीचा विषय जरी आला तर भरमसाठ पैसा द्यावा लागतो. असे एक गणित सध्या बीड जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवकांच्या उराशी गाठ बांधली असल्याचे पाहायला मिळतात, मात्र परळीतील एका सर्वसामान्य कुटुंबातील युवकांनी या सगळ्या गोष्टीचा कोणताही विचार न करता आपल्या शिक्षणाला एक ध्येय आणि एक यशाची पायरी म्हणून शिक्षण घेत राहिला आणि तब्बल बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातुन थेट दुबईपर्यंतचा प्रवासस्थाने आपल्या संघर्षातून पार पडला

# वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप : ढोरगावच्या सरवदे कुटुंबाचा उपक्रम

**माजलगाव । प्रतिनिधी**

वडिलांच्या पुण्यतिथी निमित्त जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून ढोरगाव येथील माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव विठ्ठलराव सरवदे यांच्या कुटुंबीयांनी समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे. शहरा पासून जवळच असलेल्या ढोरगाव येथील पोलीस पाटील कै. विठ्ठलराव सरवदे यांच्या पंधराव्या पुण्यतिथीनिमित्त त्यांचे मुलं माजी जिल्हा परिषद सदस्य बबनराव सरवदे आडत व्यापारी साहेबराव सरवदे प्रतिष्ठित शेतकरी छगनराव सरवदे डॉक्टर सदाशिव सरवदे या चार मुलांनी व त्यांच्या कुटुंबियांनी इतर खर्चाला फाटा





देऊन जिल्हा परिषद शाळा लाहामेवाडी येथील विद्यार्थ्यांना दि.१३ फेब्रुवारी सकाळी दहा वाजता शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले या कार्यक्रमास च्या अध्यक्षस्थानी सरपंच अशोकराव वाघमारे होते तर उद्घाटक म्हणून सेवानिवृत्त बि.डि.ओ. सुभाषराव गडदे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक ओंकार खुरपे शिवसेनेचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले माजी उपनगराध्यक्ष सतीश शेठ दुगड उद्योजक संपतराव हराळ मल्हार पतसंस्थेचे चेअरमन विशाल देवकते सेवानिवृत्त मुख्याध्यापक भगवानराव धरपडे, सेवानिवृत्त कर्मचारी अशोकराव देवकते, मल्हार सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष अशोकराव डोने, मुंजा हरी चिंचोलकर तुकाराम यमगर चंद्रकांत कापसे माणिकराव मदने गोपीनाथ मदने प्रकाश हांडे, शाळेचे मुख्याध्यापक शेख वहाब सहशिक्षक थेटे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# चौकशी चालू झाल्यानंतर चालू झालेली कामे जनतेने बंद करावीत : अ‍ैड. अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षात पैसे उचलून कामे झाले नसल्याची तक्रारी झाल्यानंतर शासनाने त्या कामांची चौकशी लावली आहे. दरम्यान पैसे उचलूनही कामे झालेली नाहीत. मात्र ती कामे आता चालू झाली असल्याचे जनतेचे म्हणणे आहे. त्यामुळे असे असेल तर जनतेने ती कमी तात्काळ बंद करावीत आणि संबंधित अधिकाऱ्याकडे तक्रारी करून आता कामे चालू केल्याचे पंचनामे करायला लावावेत, असे आवाहन जन आंदोलनाचे विश्वस्त ॲड . अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

गेल्या काही वर्षात बीडमध्ये भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला आहे. काम न करता बिले उचलण्याचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्यातच जिल्ह्यात गदारोळ माजल्यानंतर या सर्व कामाची शासनाने चौकशी चालू केली आहे. चौकशीसाठी त्रिस्तरीय समिती देखील नियुक्त केली आहे. या चौकशी समितीने आता केवळ कागदपत्र न पाहता ती कामे झाली आहेत का नाही ? याची स्पॉटवर जाऊन तात्काळ तपासणी करावी. तसेच ती कामे जर आता चालू असतील तर संबंधित गुत्तेदार, अभियंते आणि त्या-त्या भागातील संबंधित पुढाऱ्यांवर गुन्हे दाखल करावेत. भ्रष्टाचाराच्या विरोधातील लढा हा सामान्य जनतेचा लढा आहे. भ्रष्टाचारामुळे सर्वसामान्य जनता होरपळली जाते. तमाशा बघणारे लांब थांबतात आणि भ्रष्टाचार करणारे भ्रष्टाचार करत रहातात. त्यामुळे त्यांना धडा शिकवणे देखील तेवढेच गरजेचे असते. म्हणून जनतेने ही कामे आता बंद करावीत. आणि त्या-त्या विभागाच्या अधिकाऱ्यांना त्या ठिकाणचे पंचनामे करायला लावून त्या पंचनाम्याच्या सत्यप्रती हस्तगत करावयात. तसेच शासनाने देखील कागदोपत्री चौकशी न करता प्रत्यक्षात वेगवेगळ्या टीम त्या-त्या कामाच्या भागात पाठवून वेळ, स्थळ आणि काळ दर्शवणारे फोटो आणि व्हिडिओसह त्याचे पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत, असे आवाहन देखील ॲड. अजित देशमुख यांनी केले आहे.

# संत तुकाराम महाराजांचा विचार मधुकर खाडे यांनी अंगिकारला

**ह.भ.प.विनोद महाराज तपसे यांचे प्रतिपादन ; होळ येथे किर्तन सप्ताहास प्रारंभ**

**केज । प्रतिनिधी**

परिस्थिती बिकट असताना मधुकर खाडे महाराज यांनी स्वतःला वारकरी संप्रदायात वाहून घेतले. त्यांनी आयुष्यभर संत तुकाराम महाराजांचा विचार अंगिकारला, असे प्रतिपादन बीड तालुक्यातील आहेरवडगाव येथील स्वामी मनसुळनाथ गडाचे महंत ह.भ.प. विनोद महाराज तपसे यांनी व्यक्त केले. वै.पै.मधुकर खाडे महाराज यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. त्यानिमित्ताने केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह आयोजित केला आहे. भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असलेले ह.भ.प. विनोद महाराज तपसे हे गुरुवारी (दि.१३)




किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. यावेळी होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री यांच्यासह आजी-माजी विद्यार्थी उपस्थित होते. किर्तन सेवेसाठी 'धन्य ते संसारी । दयावंत जे अंतरी ।। तेथे उपकारासाठी । आले घर ज्या लटिके वचन । नाही देही उदासीन ।। मधुरा वाणी ओठी। तुका म्हणे वाव पोटी ।।' हा संत तुकाराम महाराज यांचा अभंग घेतला होता. ह.भ.प. विनोद महाराज तपसे म्हणाले, मधुकर खाडे महाराज यांनी संत तुकाराम महाराजांचा विचार अंगिकारला होता. त्यांनी वारकरी संप्रदाय, कुस्ती, राजकीय क्षेत्रात कार्य केले. वसुधैव कुटुंबकम या उक्तीप्रमाणे ते आयुष्य जगले.

# शिवजयंतीनिमित्त रामनगर येथे अखंड हरिनाम सप्ताह

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मागील १३ वर्षांपासून बीड तालुक्यातील रामनगर येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले जात आहे. या सप्ताहास बुधवार, १२ फेब्रुवारीपासून श्री क्षेत्र रामगड संस्थानचे मठाधिपती स्वामी योगीराज महाराज यांच्या उपस्थितीत प्रारंभ झाला आहे. या कार्यक्रमास पंचक्रोशितील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे ग्रामस्थांनी आवाहन केले आहे.

या सप्ताहात भावार्थ रामायण व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केले आहे. १५ रोजी बाळकृष्ण महाराज मोरे, १६ रोजी श्रीकृष्ण महाराज उबाळे, १७ रोजी उत्रेश्वर महाराज पुर्भे, १८ रोजी परमेश्वर महाराज माने यांचे प्रवचन होणार आहे. तसेच रोज रात्री ९ ते ११ वेळेत कीर्तनसेवा होणार आहे. तर १९ फेब्रुवारी रोजी सकाळी शिवजयंतीनिमित्त गावात मिरवणूक निघणार आहे. व स्वामी योगीराज महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे. तरी पंचक्रोशितील भाविकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

